महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र ०२२-२२७९३०५१
Email ID : napu22.mhpds@gov.in

---

क्र. अधापु २०२२/ प्र.क्र. १०/ना.पु.२२ दिनांक : १९ मे, २०२२.

प्रति,

१) जिल्हाधिकारी, औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा

२) जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा.

विषय :- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या राज्यातील १४ जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेप्रमाणे अन्नधान्याचा लाभ देण्यासाठी **माहे जूलै, २०२२ ते डिसेंबर, २०२२** करिता मासिक नियतन.

संदर्भ :-१) शासन निर्णय क्रमांक अधापु-२०१५/प्र.क्र.१००/नापु-२२, दिनांक २४/०७/२०१५.
२) शासन परिपत्रक क्रमांक अधापु-२०१५/प्र.क्र.१००/नापु-२२, दिनांक ५/०८/२०१५.
३) केंद्र शासनाचे पत्र क्र. २/Mizoram/२०१६-BP. III (FMS No. ३३०६९३)(ii), Dated १७.३.२०२२

केंद्र शासनाच्या दि. १७.३.२०२२ च्या पत्रान्वये राज्य शासनाने राज्य योजनेंतर्गत वितरीत केलेल्या परंतू राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजने अंतर्गत समाविष्ट न झालेल्या शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्य वितरीत करण्याकरिता **गहू ₹२२.०० प्रति किलो व तांदुळ ₹२३.०० प्रति किलो** या दराने भारतीय अन्न महामंडळाच्या विभागीय कार्यालयाकडून अन्नधान्य उपलब्ध करुन घेण्याबाबत कळविले आहे.

त्याअनुषंगाने राज्यातील औरंगाबाद विभागातील व अमरावती विभागातील सर्व जिल्हे तसेच नागपूर विभागातील वर्धा या १४ जिल्ह्यांतील एपिएल शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनील प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांप्रमाणे अन्नधान्याचा लाभ देण्याकरीता माहे जूलै, २०२२ ते डिसेंबर, २०२२ या कालावधीसाठी सोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्यानुसार अन्नधान्याचे नियतन देण्यात येत आहे.

२. **उपरोक्त अन्नधान्याकरिता डि.ओ. निर्गमित करताना "Allocation of foodgrains to the persons not covered under NFSA, 2013" असा उल्लेख करावा. त्याआधारे संदर्भाधिन दि. १७.०३.२०२२ च्या पत्रामध्ये नमूद केल्यानुसार सदर अन्नधान्याची मागणी भारतीय अन्न महामंडळाकडे स्वतंत्र पत्रान्वये करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने भारतीय अन्न महामंडळाने कळविल्यानंतर गहू ₹२२.०० प्रति किलो**

**व तांदुळ ₹२३.०० प्रति किलो या दराने उचल करावी.** पात्र लाभार्थ्यांना गहू ₹ २/- प्रतिकिलो व तांदूळ ₹ ३/- प्रतिकिलो या दराने धान्य वितरीत करावे.

३. सदर नियतनातील अन्नधान्याकरिता भारतीय अन्न महामंडळाकडे रकमा जमा करण्याची व अन्नधान्याच्या उचलीची मुदत भारतीय अन्न महामंडळ कळवेल त्यानुसार राहील.

४. सोबतच्या विवरणपत्रातील नियतनाच्या तक्त्यामध्ये दर्शविलेल्या परिमाणानुसारच लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण करणे अनिवार्य आहे.

५. **माहे जूलै, २०२२ ते डिसेंबर, २०२२** या कालावधीसाठी उक्त लाभार्थ्यांकरीता नियतनानुसार गहू व तांदळाचा साठा मुक्त करण्याच्या सूचना भारतीय अन्न महामंडळास स्वतंत्रपणे देण्यात येत आहेत.

६. दि. २३.२.२०२१ व दि. ३.६.२०२१ च्या शासन पत्रातील अन्नधान्य वितरण व उपयोगिता प्रमाणपत्राबाबत करावयाच्या सूचना विचारात घेण्यात याव्या.

(हेमंत वाडीकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत :- विवरणपत्र.

प्रत:- १) उप आयुक्त (पुरवठा) औरंगाबाद, अमरावती, नागपूर

त्यांना सूचित करण्यात येते की, नियतनाचे आदेश सर्व संबंधित जिल्हयांना ई-मेल व पत्राद्वारे पाठविण्यात आले आहेत. आपल्या विभागातील जिल्हयांना सदर आदेश प्राप्त झाले किंवा कसे याबाबत खातरजमा करण्यात यावी. आपल्या विभागातील सर्व जिल्हयांमध्ये नियतनानुसार व विहीत दराने धान्याची उचल होत असल्याची खातरजमा करावी.

२) उपसंचालक, नागरी पुरवठा,पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई, यांनी प्रस्तुत नियतनानुसार जिल्हयांनी केलेली उचल व वाटप याबाबत विवरणपत्र विहीत करुन त्याचा तपशील सर्व संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावा. सदर उचल व वाटपाबाबतचा मासिक अहवाल कक्ष अधिकारी (नापु-२२), अ. ना. पु. व ग्र. सं. वि. यांच्याकडे सादर करावा.

(हेमंत वाडीकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- १) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई
२) निवड नस्ती (कार्यासन, नापु-२२)

| शासन पत्र क्र. अधापु-२०२२/प्र.क्र.१०/नापु-२२, दि. १९.०५.२०२२ सोबतचे विवरणपत्र | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या शिधापत्रिकाधारकांकरिता (शेतकरी ) माहे जूलै, २०२२ ते डिसेंबर, २०२२ करिता मासिक नियतन | | | | | | | |
| अ.क्र | जिल्हा | लाभार्थी सदस्य संख्या | नियतनाचे परिमाण (कि.ग्रॅ.) | | मासिक नियतन (मे.टन) | | |
| | | | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | एकूण अन्नधान्य |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | औरंगाबाद | ३५८,०९१ | ३ | २ | १,०७४ | ७१६ | १,७९० |
| २ | जालना | १४३,०१२ | ३ | २ | ४२९ | २८६ | ७१५ |
| ३ | नांदेड | ३८४,८६२ | ३ | २ | १,१५५ | ७७० | १,९२५ |
| ४ | बीड | ५५३,५२६ | ३ | २ | १,६६१ | १,१०७ | २,७६८ |
| ५ | उस्मानाबाद | २५०,८८१ | ३ | २ | ७५३ | ५०२ | १,२५५ |
| ६ | परभणी | २५३,७८४ | ३ | २ | ७६१ | ५०८ | १,२६९ |
| ७ | लातूर | २९९,९३६ | ३ | २ | ९०० | ६०० | १,५०० |
| ८ | हिंगोली | १६९,५२५ | ३ | २ | ५०९ | ३३९ | ८४८ |
| ९ | अमरावती | ५०३,४९९ | ३ | २ | १,५०९ | १,००६ | २,५१५ |
| १० | वाशिम | ९९,७१३ | ४ | १ | ३९९ | १०० | ४९९ |
| ११ | अकोला | १९२,५५४ | ४ | १ | ७७० | १९३ | ९६३ |
| १२ | बुलढाणा | ३७२,०२३ | ४ | १ | १,४८८ | ३७२ | १,८६० |
| १३ | यवतमाळ | ३५८,९९६ | ३ | २ | १,०७७ | ७१८ | १,७९५ |
| १४ | वर्धा | ५६,७८१ | ३ | २ | १७० | ११४ | २८४ |
| | एकूण | ३,९९७,१८३ | | | १२,६५५ | ७,३३१ | १९,९८६ |

(स्वाक्षरी)